# शाहिरी कला जोपासणे काळाची गरज

## डॉ. डी. टी. शिर्के : शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा सांगता समारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : प्रबोधनात्मक परंपरेचा वारसा जिंवत ठेवण्यात शाहिरी कलेने योगदान दिले असून, ही कला जोपासणे काळाची गरज आहे, असे मत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय व अण्णाभाऊ साठे अध्यासनातर्फे वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा सांगता समारंभ झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शाहीर राजू राऊत प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'महाराष्ट्राला शाहिरीची प्राचीन परंपरा आहे. शाहिरी कला ही मानवी जीवनात रसनिर्मितीचे सामर्थ्य निर्माण करते.'

यावेळी 'थाफ डफावर मार शाहिरा' या प्रात्यक्षिकाचे सादरीकरण झाले. सहभागी प्रशिक्षणार्थींनी छत्रपती शिवाजी महाराजांसह लोकनायकांना नमन करून कार्यक्रमाची सुरूवात केली. गायक राजू नदाफ याने 'मल्हारवारी मोतीयाने द्यावी भरून' चित्रपट गीत



सादर केले.

प्रशिक्षणार्थी महेश सोनुले व सहकाऱ्यांनी 'माझी मैना गावाकडं राहिली माझ्या जीवाची होतीया काहिली' हे गीत सादर केले. शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरीस मुजरा केला. शाहीर भारती कोळेकर व सहकाऱ्यांनी जागा झालाय समाज आज, मुलगी जन्माला येता घरात सुख वाटाया लागलं, तर शाहीर माधवी काटकर यांनी 'विर मर्द झाशी की राणी' पोवाडा सादर केला. यावेळी भेदीक शाहिरी, शिवरायांचा गोंधळ, महाराष्ट्राचे शाहीर आम्ही व जग बदल घालुनी घाव, पोवाड्याचे सादरीकरण झाले.

डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

# ज्ञानाबरोबरच कौशल्य, सुसंस्कारांची गरज

## एस. एच. पवार : न्यू कॉलेज, कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचा दीक्षान्त समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : भविष्याचा वेध घेणारी व्यापक दृष्टी निर्माण होण्यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये मिळणाऱ्या ज्ञानाबरोबरच व्यवहारज्ञान, कौशल्य, सुसंस्कार आणि चारित्र्याची गरज आहे. पदवी मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संशोधन कार्य करावे, असे प्रतिपादन बारामती येथील सीआयएआरटीसी कॉलेजचे संचालक डॉ. एस. एच. पवार यांनी सोमवारी (दि. १७) केले.

न्यू कॉलेज आणि कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या द्वितीय दीक्षान्त समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे उपाध्यक्ष प्रा. डी. जी. किल्लेदार होते. या कार्यक्रमात न्यू कॉलेज, कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या विविध विभागांतील प्रथम क्रमांक प्राप्त स्नातकांना प्रमुख उपस्थितांच्या हस्ते पदव्या प्रदान केल्या. शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाल्याबद्दल अभिषेक श्रीराम याचा सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. सी. आर. गोडसे, ए. जी. वणिरे, प्रा. विनय पाटील, सविता पाटील, एस. ए. निगडे, पी. सी. पाटील, के. जी. पाटील, वाय. एल. खाडे, पी. के. पाटील, व्ही. एस. मोरे, सी. एम. गायकवाड, डी. बी. इंगवले आदी उपस्थित होते.

न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही एम. पाटील यांनी स्वागत केले. प्रा एम. ए. नायकवडी, यू. के गायकवाड, यू. आर. बिरजे यांनं सूत्रसंचालन केले. कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचे प्राचार्य एस. जी. दिं यांनी आभार मानले.



न्यू कॉलेज, कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या दीक्षान्त समारंभात डॉ. एस. एच. पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आर. बी. भास्कर, एस. जी. दिगे, व्ही. एम. पाटील, डी. जी. किल्लेदार, भारती पाटील, बी. जी. बोराडे उपस्थित होते.

### दीक्षान्त मिरवणूक

दीक्षान्त समारंभाच्या मिरवणुकीला महाराष्ट्र हायस्कूलच्या प्रवेशद्वारापासून सुरुवात झाली. त्यामध्ये डॉ. पवार, प्रा. भारती पाटील, व्ही. एम. पाटील आणि विशेष प्रावीण्यप्राप्त विद्यार्थी, स्नातक सहभागी झाले होते.

# शिवाजी विद्यापीठाच्या 'एनएसएस' संचालकपदी अभय जायभाये

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या



राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) कक्षाच्या संचालकपदी प्रा. डॉ. अभय जायभाये यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्या नागठाणे येथील आर्टस अँड कॉमर्स कॉलेजचे समाजशास्त्र विभागप्रमुख व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

नवीन महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील नियमानुसार या संचालकपदी विद्यापीठाने प्रा. जायभाये यांची तीन वर्षांसाठी नियुक्ती केली आहे. त्यांनी पदभार स्वीकारला आहे. सध्या या पदावर प्रा. डॉ. डी. के. गायकवाड कार्यरत होते.

> राष्ट्रीय सेवा योजना आधुनिक करण्यावर माझा भर राहणार आहे. ही योजना जास्तीत जास्त समाजाभिमुख करून विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक बनविण्याचे काम करणार आहे. - **प्रा. अभय जायभाये**

प्रा. जायभाये यांचे मूळ गाव साष्टपिंपळगाव (ता. अंबड, जि. बुलढाणा) आहे. ते स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये २००४ पासून कार्यरत आहेत.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज, मिरज; मीनलबेन मेहता कॉलेज, पाचगणी या शाखांमध्ये त्यांनी 'एनएसएस'सह अध्यापनाचे कार्य केले आहे. त्यांनी यापूर्वी 'एनएसएस'चे वाई आणि सातारा ग्रामीण विभागीय समन्वयक म्हणून काम केले आहे. सध्या ते सातारा जिल्हा समन्वयक म्हणून कार्यरत होते. विद्यापीठाने त्यांना दोन वेळा उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्काराने सन्मानित केले आहे.

## शिवाजी विद्यापीठात 'थाप डफावर मार शाहिरा' रंगले : प्रशिक्षण शिबिराचा समारोप

# मुलगी जन्माला येता घरात सुख वाटाया लागलं!

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'जागा झालाय समाज आज, मुलगी जन्माला येता घरात सुख वाटाया लागलं', 'माझी मैना गावाकडं राहिली, माझ्या जिवाची होतीया काहिली', अशा गीतांचे सादरीकरण करीत शाहिरांनी शिवाजी विद्यापीठात गुरुवारी 'थाप डफावर मार शाहिरा' कार्यक्रमात रंगत आणली.

राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि विद्यापीठातील अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये आयोजित शाहिरी प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी हा प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, शाहीर राजू राऊत प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी शाहिरी प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी 'थाप डफावर मार शाहिरा' हा कार्यक्रम रंगला. त्यात नवोदित शाहिरांनी सादरीकरण केले.

प्रशिक्षणार्थींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह लोकनायकांना नमन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. गायक राजू नदाफ याने 'मल्हारवारी मोतियाने द्यावी भरुन' हे गीत सादर केले. प्रशिक्षणार्थी महेश सोनुले आणि सहकाऱ्यांनी 'माझी मैना गावाकडं राहिली' सादर केले. शाहीर भारती कोळेकर आणि सहकाऱ्यांनी 'जागा झालाय समाज आज, मुलगी जन्माला येता घरात सुख वाटाया लागलं' हे, तर शाहीर माधवी काटकर यांनी 'बीर मर्द झाशी की राणी' हा पोवाडा सादर केला.

यावेळी भेदिक शाहिरी, शिवरायांचा गोंधळ, महाराष्ट्राचे शाहीर आम्ही व जग बदल घालुनी घाव, आदी पोवाड्यांचे सादरीकरण झाले. अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. संत तुकाराम अध्यासनाचे प्रमुख नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

### शाहिरी कलेचे मोठे योगदान

महाराष्ट्राला शाहिरीची प्राचीन परंपरा आहे. शाहिरी कला ही मानवी जीवनात रसनिर्मितीचे सामर्थ्य निर्माण करते. प्रबोधनात्मक परंपरेचा वारसा जिवंत ठेवण्यात शाहिरी कलेने मोठे योगदान दिले असून, ही कला जोपासणे ही काळाची गरज असल्याची भावना डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली.



शिवाजी विद्यापीठाचा कयाकिंग स्पर्धेचा संघ. सोबत प्रशिक्षक प्रा. धनंजय पाटील

# शिवाजी विद्यापीठाला कयाकिंगमध्ये ब्राँझ पदक

म.टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

अखिल भारतीय विद्यापीठ व मोहन लाल सुंखोडिया विद्यापीठ, उदयपूर याच्या संयुक्त विद्यमाने फतेहपूर लेक येथे झालेल्या अखिल भारतीय केनोईंग व कयाकिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने ब्राँझ पदक पटकावले. के फोर - ५०० मीटर या प्रकारामध्ये हे पदक जिंकले. विजयी संघामध्ये गिरीश नेर्लेकर, ओमकार जाधव, निखिल पिस्टे , विकास जाधव या खेळाडूंचा समावेश होता. या खेळाडूंना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन तर प्रशिक्षक प्रा. डॉ. धनंजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



**कोल्हापूर : कलिंगा विद्यापीठ (भुवनेश्वर) येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया स्पर्धेसाठी रवाना झालेला शिवाजी विद्यापीठाचा पुरुष कबड्डी संघ.**

# विद्यापीठाचा पुरुष कबड्डी संघ खेलो इंडिया स्पर्धेसाठी रवाना

**कोल्हापूर :** कलिंगा विद्यापीठ (भुवनेश्वर) येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा पुरुष कबड्डी संघ आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक रमेश भेंडीगिरी यांच्या मार्गदर्शनाखाली भुवनेश्वर येथे रवाना झाला. संघातील खेळाडू असे : संघनायक - सौरभ पाटील, ऋषीकेश देसाई, प्रतिक पाटील, शुभम पाटील, योगेश पाटील (सर्व शाहू कॉलेज, कोल्हापूर) सौरभ कुलकर्णी, अविनाश पाटील, निखिल सूर्यवंशी (सर्व के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर) मनोज नार्वेकर (महावीर कॉलेज, कोल्हापूर) गुरूराज घोडके (नाईट कॉलेज, इचलकरंजी) सौरभ वगरे (बाळासो देसाई कॉलेज, पाटण) सौरभ पाटील (छत्रपती शहाजी कॉलेज, कोल्हापूर). संघव्यवस्थापक प्रा. जहांगीर तांबोळी (जी. के. जी. कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर)